# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:24.06.2025** **वार:मंगळवार**

1. प्रशासकीय सुधारणांना चालना देण्यामध्ये अंदाज समित्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांचं प्रतिपादन
2. एनपीएस किंवा युपीएसपैकी कोणतीही एक निवृत्ती वेतन योजना निवडण्यासाठी येत्या 30 सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ
3. त्रिभाषा सूत्रावर सर्व संबंधितांशी बोलूनच अंतिम निर्णय घेणार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही
4. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉक्टर विजय केळकर यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पुण्यभूषण पुरस्कार प्रदान आणि
5. अँडरसन-तेंडुलकर चषक क्रिकेट कसोटीमध्ये भारताचं इंग्लंडसमोर विजयासाठी 371 धावांचं लक्ष्य

**ओमबिर्ला**

प्रशासनाची कार्यक्षमता सुधारून प्रशासकीय सुधारणांना चालना देण्यामध्ये अंदाज समित्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी म्हटलं आहे. संसदेसह राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अंदाज समित्यांच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन काल मुंबईत ओम बिर्ला यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. लोककल्याणासाठी या समित्यांनी वेळोवेळी शिफारसी केल्याचं सांगून ते म्हणाले....

**प्राकलन समिति के प्रयासों से सरकारी धन के अपव्यय को रोका गया। शासन में कुशलता पारदर्शिता लाई शासन में जवाब दे लाए और कई बड़े निर्णय फैसले जिन फैसलों के माध्यम से सरकारी कार्यकुशलता को कैसे वर्तमान परिप्रेक्ष्य में बेहतर बनाया जा सकता है। इसके महत्वपूर्ण निर्णय इस प्राकलन समिति में हुए है और मुझे खुशी है की लोकसभाओं और कई राज्यसभाओं में नब्बे से पचहत्तर पचानवे प्रतिशत प्राकलन समिति की सिफारिशों को सरकार ने माना है।**

संसदेच्या अंदाज समितीच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त काढलेल्या विशेष स्मरणिकेचं प्रकाशन यावेळी ओम बिर्ला यांच्या हस्ते करण्यात आलं. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. समितीच्या कामकाजाविषयी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले.....

**बड़े डायनामिक तरीके से काम करने वाली अगर कोई कमिटी है तो वो प्राकलन कमिटी है, क्योंकि ये कमिटी लगातार हमारे बजेट में जो बजेट एस्टीमेट्स है, उसको किस प्रकार से उसकी मांग की गई क्या वो मांग सही थी? क्या उसका खर्चा ठीक से हो रहा है ये सारी चीज़ें ये एस्टीमेट्स कमिटी देखती है और एक प्रकार से इस पूरी प्रक्रिया के ऊपर अंकुश रखने का काम estimate कमिटी के माध्यम से होता है।**

विकासासाठी खर्च केला जाणारा प्रत्येक रुपया सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. आणि त्यादृष्टीने संसदेच्या अंदाज समितीचं काम खूप परिणामकारक ठरतं असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. तर आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि लोककल्याणाच्या मूल्यांची अंमलबजावणीचं प्रभावी माध्यम म्हणजे अंदाज समिती असं विधानसभा अध्यक्ष ॲडव्होकेट राहुल नार्वेकर म्हणाले. सुशासन हे केवळ नियमांचं पालन नव्हे, तर समाजाच्या सर्व घटकांना समाविष्ट करून शाश्वत उपाय शोधणं आहे असं मत विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी व्यक्त केलं.

राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, अंदाज समितीचे अध्यक्ष डॉ. संजय जैसवाल, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महाराष्ट्र विधानमंडळाच्या अंदाज समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांच्यासह सर्व राज्यं, केंद्रशासित प्रदेशांच्या अंदाज समित्यांचे अध्यक्ष आणि सदस्य कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<u>अकरावर्ष</u>**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या त्रिसूत्रीनुसार काम करत केंद्र सरकारनं देशात गेल्या अकरा वर्षात उल्लेखनीय परिवर्तन घडवून आणलं आहे. शेतकरी, महिला, युवावर्ग याबरोबरच अल्पसंख्याक समुदायाच्या सक्षमीकरणासाठी देखील गेल्या दशकभरात अनेक निर्णय घेतले आहेत. राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास आणि आर्थिक महामंडळाच्या माध्यमातून सुमारे पावणे दोन कोटी लाभार्थ्यांना 752 कोटी रुपये हस्तांतरित करण्यात आले आहेत. हज यात्रेकरुंसाठी हज सुविधा ॲप, पारदर्शकता आणि सुशासनासाठी ऐतिहासिक वक्फ कायदा, याशिवाय बुद्धीस्ट विकास योजना, जियो पारसी अशा विविध योजनांच्या माध्यमातून विविध समुदायांच्या कल्याणासाठी सरकारनं निर्णय घेतले आहेत.

**<u>निवृत्ती वेतन</u>**

केंद्र सरकारनं अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना युपीएस अर्थात एकीकृत निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय निवडण्यासाठी आणखी 3 महिन्यांचा अवधी दिला आहे. एनपीएस किंवा युपीएस पैकी कोणती निवृत्ती वेतन योजना निवडायची हे आता 30 सप्टेंबर पर्यंत कळवता येईल.

**<u>त्रिभाषा</u>**

त्रिभाषा सूत्रासंदर्भात साहित्यिक, भाषा तज्ञ, राजकीय नेते आणि इतरही सर्व संबंधितांशी चर्चा करुनच अंतिम निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. त्रिभाषा सूत्रासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या निवासस्थानी काल बैठक झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर आणि शिक्षण विभागातील अधिकारी यावेळी उपस्थित होते. या विषयावर सर्वांगीण चर्चा झाल्यानंतर सर्व राज्यांची स्थिती सर्वांसमोर मांडावी, नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत मराठी मुलांचं ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटच्या अनुषंगाने नुकसान होऊ नये, यासह इतरही पर्यायांवर सर्वांसाठी समग्र सादरीकरण करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

**<u>परिवहन मंत्री</u>**

गेली अनेक वर्षे सातत्याने तोट्यात असलेल्या एसटी महामंडळाला येत्या 4 वर्षात फायद्यात आणण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी काल दिली. मुंबईत एस टी महामंडळाची आर्थिक श्वेतपत्रिका प्रसिद्ध केल्यानंतर ते बोलत होते.

**<u>पुण्यभूषण</u>**

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर यांना 2025 या वर्षासाठीचा पुण्यभूषण पुरस्कार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि प्रा. एम. एम. शर्मा यांच्या हस्ते काल पुण्यात प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. डॉ. विजय केळकर यांनी जीएसटीच्या पुनर्रचनेच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्थेला दिशा दिली, असे गौरवोद्गार नितीन गडकरी यांनी यावेळी काढले; ते म्हणाले...

**विजय केळकरांनी विशेषतः आयएएस ऑफिसर म्हणून आपल्या देशामध्ये अनेक क्षेत्रामध्ये काम करायची त्यांना संधी मिळाली. डॉक्टर केळकर यांनी विशेष रूपाने सर्व क्षेत्रात उत्तमच काम केलं पण फायनान्स सेक्रेटरी म्हणून त्यांनी जे धोरणं आखली त्याचा भारताच्या भविष्यावर दूरव्यापी परिणाम झालेला आहे आणि त्यामुळे त्यांचं हे कार्य, खूप मोलाचं आणि महत्त्वाचं आहे. मला आठवतं दोन हजार नऊ साली प्रणव मुखर्जी ज्यावेळी अर्थमंत्री होते त्यावेळी सातत्याने ते जीएसटी च्या बाबतीत एकमत करण्याचा प्रयत्न करत होते. आणि विशेषतः या जीएसटी च्या स्वीकारण्याच्या बाबतीमध्ये अनेक प्रकारच्या अडचणी होत्या. खरं म्हणजे या सगळ्या योजनेची कल्पकता ही डॉक्टर विजय केळेकर यांची होती.**

**स्वच्छवारी-सोलापूर**

यंदाची आषाढी वारी स्वच्छ आणि सुंदर होण्यासाठी सोलापूर जिल्हा प्रशासनातर्फे जय्यत तयारी करण्यात येत असल्याची माहिती सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. यावर्षी स्वच्छता राखण्यासाठी सुमारे 11 हजार शौचालयं उभारण्यात येणार असून महिलांसाठी दीड हजार स्नानगृहं उभारण्यात येणार आहेत, असं त्यांनी सांगितलं.

**ऑलिम्पिक दिवस- पालघर**

खेळाडू, आणि क्रीडा संघटनांना येणाऱ्या अडीअडचणी सोडवून त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन खंबीर पाठबळ देईल, अशी ग्वाही राज्याचे क्रीडा आणि युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिनानिमित्त क्रीडा आणि युवक कल्याण संचालनालय तसंच महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेनं पुण्यात आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते काल बोलत होते.

**स्केटिंग सुवर्ण**

भुसावळच्या सानवी सोनवणे हिनं थायलंडमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय रोलर रिले स्केटिंग स्पर्धेत सुवर्ण कामगिरी केली आहे. या स्पर्धेत सानवीनं आपल्या वयोगटात दोन सुवर्ण आणि तीन रौप्य पदकं पटकावली. भारतासह सहा देशांचे खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते.

**क्रिकेट**

अँडरसन-तेंडुलकर चषकाच्या हेडिंग्ले इथं सुरू असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेटमध्ये भारताने इंग्लंडसमोर जिंकण्यासाठी पहिल्या डावातील 6 धावांच्या आघाडीसह 371 धावांचं उद्दिष्ट ठेवलं आहे. दुसऱ्या डावात भारताने 364 धावा केल्या; उपकर्णधार ऋषभ पंतने 118 धावा फटकावल्या. दोन्ही डावात शतक ठोकणारा तो पहिला भारतीय क्रिकेटपटू ठरला आहे. के एल राहुलनेदेखील संयमी 137 धावा केल्या. मात्र भारताचे शेवटचे तीन फलंदाज शून्यावर बाद झाले. काल दिवसअखेर इंग्लंडने बिन बाद 21 धावा केल्या आहेत. सामन्याचा आज अखेरचा दिवस आहे.

**पाऊस-नाशिक**

पुणे आणि परिसरात आज पहाटेपासून पावसानं जोरदार हजेरी लावली. नाशिक शहरासह जिल्ह्यातही काल हलका ते मध्यम पाऊस सुरू होता; गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर जास्त असल्याने धरणातून सुरू असलेला विसर्ग आणखी वाढवण्यात आला आहे.

**हवामान इशारा**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.